अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- १४/११/२०२५

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३६/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| अटक आरोपी लोकसेवक | गजानन प्रल्हाद राठोड, ४० वर्षे, पद- सहायक अभियंता(विद्यूत), विद्यूत निरीक्षण यांचे कार्यायल, एल.बी.एस. रोड, कुर्ला(प), मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये १,८०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये ४,००,०००/- ची मागणी करून टोकन म्हणून रू. १,००,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार हे त्यांच्या पत्नीचे कंपनीत प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून कामकाज पाहतात. नमूद कंपनीमार्फत विद्यूत उद्वाहन स्थापित करणे, देखभाल करणे, इत्यादी कामे केली जातात. नमूद कामाच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक १६/१०/२०२५ रोजी ठेकेदार फाईल सातांक्रुझ निरीक्षक विभाग, उर्जा खाते, महाराष्ट्र शासन, एल.बी.एस. रोड, कुर्ला(प), मुंबई येथे सादर केली होती. नमूद कामाच्या अनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक २९/१०/२०२५ रोजी नमूद कार्यालयात जावून, लोकसेवक गजानन राठोड यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी नमूद कामाकरीता तक्रारदार यांचेकडे रू. १,८०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून आगाऊ रक्कम म्हणून रू. ५०,०००/- तात्काळ आणून देण्यास सांगितले. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/०९/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/११/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना नमूद परवानाकरीता दुप्पट खर्च येईल असे सांगून रू. ४,००,०००/- इतक्या लाचेची मागणी करून टोकन म्हणून रू. १,००,०००/- लाच मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १३/११/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक गजानन प्रल्हाद राठोड, सहायक अभियंता यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. १,००,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्रीमती सुषमा खोत, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. गणपत परचाके, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(मनिषा झेंडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**